# <u>पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर</u>

## प्रेस नोट दि.२८/०६/२०१८

## <u>दि.२७/०६/२०१८ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे</u>

**<u>भाग-१ ते ५ चे गुन्हे</u>**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | खडक पो स्टे २१८/१८,भादविक ३९२,३५४(अ),४२७,४५२,५०४,५०६(२),महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७(१) सह १३५ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-२१ वर्षे,रा.पुणे |
| **आरोपी** | जाफर अब्बास खान,वय-३८ वर्षे,रा.७२८,भवानी पेठ,चुडामन तालीम चौक,पुणे (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२७/०६/२०१८ रोजी पहाटे ०१/३० वा. फिर्यादी यांचे घरासमोर व घरामध्ये |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया घराचे बाहेर भांडी धुत असताना,त्यांचे वस्तीमध्ये राहणारा यातील नमुद इसम जाफर अब्बास खान हा फिर्यादी यांचे घरासमोर लघुशंका करण्यासाठी आला असताना,त्याने फिर्यादी यांचा विनयभंग करून,त्यांचे गळयातील सोन्याची चेन हिसकावुन तोडुन पळुन गेला. त्यानंतर काही वेळाने परत हाता मध्ये चाकु सारखे हत्यार घेवुन,फिर्यादी व त्यांचे नातेवाईक यांना शिवीगाळ करून त्यांना जीवे मारण्याची धमकी देवुन,फिर्यादी यांचे घराचे दरवाज्यावर लाथा मारून,चाकु सारख्या हत्याराने दरवाजाचा पडदा फाडला. तसेच घराचे आंत येऊन फिर्यादी यांचे आजीस शिवीगाळ करून,फिर्यादी यांचा मावस भावास लाथा मारून जीवे मारण्याची धमकी देवुन,फिर्यादी यांचे घरातील भांडी खाली फेकुन निघुन गेला. |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस निरीक्षक, जे.सी.मुजावर ९८५०४२५१०० |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | खडक पो स्टे २१९/१८,भादविक ३९२ |
| **फिर्यादी** | रिहान शेख,वय-२० वर्षे,रा.७२२,भवानी पेठ,पुणे |
| **आरोपी** | मोटार सायकलवरील एक अनोळखी इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२६/०६/२०१८ रोजी २३/३० वा. कुमार सोसायटी,जुना मोटार स्टँड चौका जवळ,भवानी पेठ,पुणे समोरील रस्त्यावर |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांनी त्यांचे खिशात ठेवलेले १०,०००/- रुपये काढुन ते मोजुन,त्यातील ४,०००/- रुपये दुस-या खिशात खर्चासाठी वेगळे ठेवुन,ऊरलेले ६,०००/- रुपये पुन्हा मोजत असताना,यातील नमुद इसमाने फिर्यादीस अडवुन त्यांचेशी झटापटी करुन,त्यांचे हातातील ६,०००/- रुपये हिसकावुन घेऊन गेला. |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस निरीक्षक, जे.सी.मुजावर ९८५०४२५१०० |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वानवडी पो स्टे २५३/१८,भादविक ३९२,३४ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-४०,रा.रामटेकडी,वानवडी,पुणे |
| **आरोपी** | मोटार सायकलवरील दोन अनोळखी इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२७/०६/२०१८ रोजी १४/४५ वा. सतीश कसबे ऑफिस समोर रामटेकडी,वानवडी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया वटपुजा करून त्यांचे राहते घरी पायी जात असताना,नमुद इसमांनी दुचाकीवरून त्यांचे जवळ येवुन,फिर्यादी यांचे गळयातील सोन्याचे मंगळसुत्र ३० हजार रू किमतीचे जबरदस्तीने हिसका मारून,तोडुन चोरून नेले. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. राऊत ९९७०८४७६२४ |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वानवडी पो स्टे २५४/१८,भादविक ३९२,३४ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-३०,रा.घोरपडी,पुणे येथे |

| | |
|---|---|
| **आरोपी** | मोटार सायकलवरील दोन अनोळखी इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२७/०६/२०१८ रोजी १४/४५ वा. आयप्पा मंदिरा समोर घोरपडी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया त्यांचे मुलीस शाळेतुन घरी जाण्यासाठी पायी जात असताना,नमुद इसमांनी दुचाकीवरून त्यांचे जवळ येवुन,फिर्यादी यांचे गळयातील सोन्याची चेन ३० हजार ९००/- रू किमतीची जबरदस्तीने हिसका मारून,तोडुन चोरून नेली. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. म्हेत्रे ९८८१२ ३८१५६ |
| **५** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे ७६२/१८,भादविक २७९,३०४(अ),मोव्हेॲक्ट १८४,१३२(१)(क),११९/१७७ |
| **फिर्यादी** | विलास कांबळे,वय-४२ वर्षे,रा.साडे सतरानळी हडपसर,पुणे |
| **आरोपी** | सागर विलास जाधव,वय-२८ वर्षे,रा.शिंदेवाडी,ता.पंढरपुर,जि.सोलापुर (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२७/०६/२०१८ रोजी १५/३० वा.सासवड-हडपसर रोडवरील फुरसुंगी रेल्वे ब्रिजवर हडपसर, पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांची पत्नी सौ.गेनु विलास कांबळे,वय-३५ वर्षे हिचेसह त्यांचे मोटार सायकलवरून त्यांचे राहते घरी येत असताना,नमुद इसम सागर विलास जाधव याने त्याचे ताब्यातील ट्रक हा वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून,हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी फिर्यादी यांचे मोटार सायकलला जबर ठोस मारून,त्यांचे पाठीमागे बसलेली त्यांची पत्नी सौ.गेनु कांबळे हिस गंभीर जखमी करून,तीचे मृत्युस कारणीभुत होवुन,अपघाताचे ठिकाणी न थांबता,अपघाताची खबर न देता पळुन गेला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. शेंडगे ९८२३९२३६१८ |
| **६** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | मार्केटयार्ड पो स्टे ११२/१८,भादविक ४२० |
| **फिर्यादी** | आशिष गुजराथी,वय-३९ वर्षे,रा.पारसनीस कॉलनी,मार्केटयार्ड,पुणे |
| **आरोपी** | एक आशुतोष नावाचा इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०१/०३/२०१८ ते दि.२४/०६/२०१८ रोजीपर्यंत सुर्यप्रभा अपार्टमेंट मार्केटयार्ड,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील मार्च-२०१८ मध्ये मराठी वर्तमान पत्रामध्ये काशी यात्रा टुर्स आयोजीत करण्याची जाहीरात देऊन,फिर्यादी यांची आई व इतर २२ साक्षीदार महिला यांचेकडुन काशी त्रिस्थळी यात्रेकरीता प्रवास टिकीट खर्च व यात्रेचा इतर खर्च असे एकुण ५,१७,१००/- रुपये घेऊन प्रवासाचे टिकीट बुकींग,हॉटेल बुकींग व बस बुकींग इत्यादी न करता काशी त्रिस्थळी यात्रेस न नेता त्यांचे दिलेले पैसे परत न करता,फिर्यादी यांची आई व इतर २२ साक्षीदार महिलांची फसवणुक केली आहे. (सदरचा गुन्हा दि.२६/०६/२०१८ रोजी अंलकार पो स्टे येथुन ००/२०१८ अन्वये आल्याने दाखल केला आहे.) |
| **त.अंमलदार** | पो.हवा. आर.एन.राऊत ९८२३३५००२२ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**